**प्रेसनोट**

दि.३०/०९/२०२२

## कुसगाव खुर्द, ता. मावळ, जि. पुणे येथील सरपंच व ग्रामसेवक यांचेवर लाच स्वीकारले प्रकरणी कारवाई

| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | पुणे घटक |
|---|---|
| गुन्हा नोंद क्रमांक | कामशेत पोलीस स्टेशन, पुणे ग्रामीण येथे गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे. |
| कलम | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम कलम - ७, १२ |
| तक्रारदार | पुरूष, वय - ३३ वर्षे |
| आरोपीचे नाव व कार्यालय | लोकसेवक -<br>१) अनिल बाळू येवले, वय - ३३, सरपंच, कुसगाव खुर्द, ता. मावळ, जि. पुणे<br>२) अमोल बाळासाहेब थोरात, वय - ३४ वर्षे, ग्रामसेवक, कुसगाव खुर्द ग्रामपंचायत, ता. मावळ, जि. पुणे |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १०,०००/- ( दहा हजार रूपये) |
| स्वीकारलेली लाच रक्कम | ८,०००/- (आठ हजार रूपये) |

पडताळणी दिनांक :- २९/०९/२०२२
सापळा दिनांक :- ३०/०९/२०२२
ठिकाण :- ग्रामपंचायत कार्यालय, कुसगाव खुर्द, ता. मावळ, जि. पुणे

थोडक्यात माहिती :- यातील तक्रारदार यांचे चुलत आजी आजोबा यांचे मृत्युचे प्रमाणपत्र मिळण्याकरीता तसेच त्यांचे चुलत आजोबा यांच्या मृत्यु प्रमाणपत्रासाठी केलेले मागणी अर्ज व हरकती अर्ज यांच्या प्रती मिळण्याकरीता तक्रारदार यांनी ग्रामपंचायत कुसगांव खुर्द येथे दि.२६/०९/२०२२ रोजी अर्ज दिला होता. ग्रामपंचायतीचे सरपंच येवले यांनी दाखले देण्याकरीता लाचेची मागणी केल्याची तक्रार ला.प्र.वि. पुणे येथे दिली.

सदर तक्रारीची पडताळणी केली असता कुसगाव खुर्द ग्रामपंचायतीचे सरपंच येवले यानी दाखले देण्याकरीता १० हजार रूपयाची मागणी करून तडजोडीअंती ८ हजार रूपये लाच रक्कम स्वीकारली. सरपंच येवले यानी केलेल्या लाच मागणीस लोकसेवक थोरात (ग्रामसेवक) यानी प्रोत्साहन दिले. दोघांना ताब्यात घेण्यात आले असून गुन्हा नोंद करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

ला.प्र.वि. पुणे युनिटच्या पोलीस उप अधीक्षक सीमा आडनाईक तपास करत आहेत.

सदरची कारवाई मा.पोलीस उप आयुक्त/पोलीस अधीक्षक श्री. राजेश बनसोडे, ला.प्र.वि. पुणे परिक्षेत्र, मा. अपर पोलीस अधीक्षक श्री. सुरज गुरव, ला.प्र.वि. पुणे यांचे मार्गदर्शनाखाली पुणे लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने केली.

शासकीय अधिकारी, कर्मचारी / लोकसेवकाने लाचेची मागणी केल्यास त्याबाबत लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे कार्यालयास खालील नमूद क्रमांकवर सपर्क साधण्याचे आवाहन श्री. राजेश बनसोडे, पोलीस अधीक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, पुणे यांनी केले आहे.

१. हेल्पलाईन टोल फ्री क्रमांक १०६४
२. ॲन्टी करप्शन ब्युरो, पुणे - दुरध्वनी क्रमांक - ०२० - २६१२२१३४, २६१३२८०२, २६०५०४२३
३. व्हॉट्स-ॲप क्रमांक पुणे - ७८७५३३३३३३
४. व्हॉट्स-ॲप क्रमांक मुंबई - ९९३०९९७७००
५. ई-मेलआयडी - पुणे dyspacbpune@mahapolice.gov.in
६. वेबसाईट - www.acbmaharashtra.gov.in
७. ऑनलाईन ॲप तक्रार - www.acbmaharashtra.net.in

(श्रीहरी पाटील)
सहायक पोलीस आयुक्त/पोलीस उप-अधीक्षक (प्रशासन)
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग पुणे.